# <u>शाळेचा शेवटचा दिवस</u>

साराच्या शाळेचा आज शेवटचा दिवस होता. आता शाळा संपून उन्हाळा सुरु होणार. सुट्टी सुरु होणार. साराला शाळेचा शेवटचा दिवस आवडतो सुद्धा आणि आवडत नाही सुद्धा.

साराला शाळेत खूप मजा येते. तिला गणिताचा तास आवडतो. संगीताचा तास आवडतो. तिला चित्रकला आवडते. तिला मित्र आणि मैत्रिणींबरोबर डबा खायला आवडतो. मधल्या सुट्टीत मैदानावर खेळायला तर खूपच मजा येते. सारा शाळेच्या संघाकडून खो-खो सुद्धा खेळते.

पण साराला उन्हाळ्याची सुट्टी सुद्धा तितकीच आवडते. सुट्टीत तिला घरचा अभ्यास करायचा नसतो. रोज सकाळी उशिरा उठता येतं. मित्र आणि मैत्रिणींबरोबर अंगणात खेळता येतं. तलावात पोहायला जाता येतं. आई-बाबा आणि दादा बरोबर सहलीला जाता येतं. मागच्या सुट्टीत ती एका शिबिराला सुद्धा गेली होती. तिथे तिला नवीन मित्र आणि मैत्रिणी मिळाले. त्यांनी शिबिरात खूप नवीन गोष्टी शिकल्या. हस्तकला केली. खेळ खेळले. खूपच धमाल केली.

मग सांगा, शाळेचा शेवटचा दिवस चांगला का वाईट?



~~~

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~

1. वर्तमानकाळ: “साराला शाळेत खूप मजा येते.”

वर्तमानकाळातील आणखी दोन वाक्ये शोधून त्यांच्याखाली --- अशी रेघ मारा.

तुमच्या मनाने दोन वाक्ये लिहा.

2. भूतकाळ: “त्यांनी शिबिरात खूप नवीन गोष्टी शिकल्या.”

भूतकाळातील आणखी दोन वाक्ये शोधून त्यांच्याखाली ~~~ अशी रेघ मारा.

तुमच्या मनाने दोन वाक्ये लिहा.

3. पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा - गणित, संगीत, चित्रकला, मैदान, तलाव

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH

4. तुम्हाला शाळा का आवडते?

5. तुम्हाला उन्हाळ्याची सुट्टी का आवडते?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH